नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३३ Issue - 33 | वार - शनिवार दि. २७ जून २०२६ Blow- Saturday Date 27 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राम मंदिर देणगी अपहारप्रकरणी आठ जणांना घेतले ताब्यात

## एसआयटीच्या अहवालानंतर उत्तर प्रदेश पोलिसांची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अयोध्या: अयोध्येतील राम मंदिरासाठी आलेल्या देणग्यांमध्ये अपहार केल्याप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी गुरुवारी आठ जणांवर गुन्हे दाखल केले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) दोन दिवसांपूर्वी उत्तर प्रदेश सरकारकडे प्राथमिक अहवाल सादर केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

रमाशंकर उर्फ टिन्नू यादव, अनुकल्प मिश्रा, अविनाश शुक्ला, कमलेश पांडेय, मनीष यादव, लवकुश मिश्रा, रामा शंकर मिश्रा आणि सुभाष श्रीवास्तव अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी ८ जणांना ताब्यात घेतले आहे.

राम मंदिराच्या उभारणीसाठी तसेच मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही मोठ्या प्रमाणात देणग्या देण्यात आल्या. मात्र, या देणग्यांमध्ये अपहार झाल्याचा आरोप सातत्याने केला जात होता. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी दबाव वाढत असतानाच विश्व हिंदू परिषदेनेही चौकशीची मागणी लावून धरली होती. अखेरीस मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंदिर न्यासाकडून तक्रार आल्यानंतर १३ जून रोजी तीन जणांची एसआयटी स्थापन केली. त्यात लखनौचे विभागीय पोलिस आयुक्त विजय पंत, पोलिस महानिरीक्षक किरण एस. आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे.



या एसआयटीने दोन दिवसांपूर्वी प्राथमिक अहवाल सरकारकडे सादर केला. त्यानंतर गुरुवारी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हे दाखल केले. 'याप्रकरणी जो दोषी आढळेल त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल,' असे तपास अधिकाऱ्याने सांगितले. एसआयटीने याप्रकरणी कठोर पावले उचलण्याची शिफारस केली असून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही हे प्रकरण गांभीर्याने घेतले असल्याचे सरकारमधील सूत्रांनी सांगितले.

भारतीय न्यायसंहितेचे कलम ३०६ (मालकाच्या ताब्यातील मालमत्तेची कारकून वा नोकराद्वारे चोरी), कलम ३१६ (विश्वासघात), कलम ३१७ (चोरीचा माल स्वीकारणे), कलम ६१ (गुन्हेगारी कट रचणे) अंतर्गत आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील सहा जण मंदिराचे कर्मचारी असून त्यांच्याकडे रोख रक्कम मोजण्याचे काम होते. आठही जण पैशांचा अपहार करत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेरांमध्ये आढळून आल्याचे सूत्रांनी सांगितले.

गुन्हा दाखल झालेले आठ आरोपी

अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीषकुमार यादव, करुणेश पांडे, रामशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव आणि रामशंकर उर्फ टिनू यादव, अशी गुन्हा दाखल झालेली आरोपींची नावे आहेत. त्यातील टिनू यादव हा राम मंदिर न्यासाचे सरचिटणीस चंपत राय यांचा माजी चालक आहे. लवकुश मिश्रा आणि अनुकल्प मिश्रा यांच्याकडे देणग्यांच्या रकमेची मोजणी करण्याचे काम होते. या सर्वांची चौकशी सुरू असून कोणासही अटक करण्यात आलेली नाही.

# एमपीएससी परीक्षेत मोठा बदल, आता २१ दिवसांत निकाल येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने भरती प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे आयोगाच्या सर्व आगामी पूर्व परीक्षा संगणकाधारित कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी ही माहिती मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

आयोगाने परीक्षांतील विलंब कमी करण्यासाठी काही महत्त्वाचे बदल लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, प्रत्येक पूर्व परीक्षेचा निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल २२ दिवसांत जाहीर करण्यात आला असून, पुढील सर्व परीक्षा २१ दिवसांच्या आत निकालासह पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत मोठा बदल; पूर्व परीक्षा आता सीबीटी पद्धतीने**

घेतलेल्या परीक्षांचा निकाल त्याचवर्षी

भरती प्रक्रिया देखील अधिक वेगाने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. ज्या वर्षी परीक्षा होईल, त्याच वर्षात भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. मुलाखत असलेल्या पदांसाठी ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षा असलेल्या पदांसाठी ६ ते ७ महिन्यांत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आयोगाने स्पष्ट केले की, हा बदल फक्त पूर्व परीक्षांसाठी लागू असेल. राज्यसेवा, गट 'अ', गट 'ब' आणि गट 'क'च्या मुख्य परीक्षांच्या स्वरूपात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

मुख्य परीक्षा पूर्वीप्रमाणेच पारंपरिक पद्धतीने घेतल्या जातील. विवेक भीमनवार यांनी सांगितले की, उइढ आणि नॉर्मलायझेशन ही नवी पद्धत नाही. आयोगाने यापूर्वीही सुमारे १४० परीक्षा या पद्धतीने यशस्वीपणे घेतल्या आहेत. तसेच स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, स्टेट उएढ सेल आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी यांसारख्या संस्थाही हीच पद्धत वापरत आहेत.

या निर्णयामुळे परीक्षा प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होईल. तसेच उमेदवारांना निकाल आणि भरतीसाठी जास्त काळ प्रतीक्षा करावी लागणार नाही, असा विश्वास आयोगाने व्यक्त केला.

# ...म्हणून मी त्याला लोहगडावरून खाली ढकलले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील उद्योगपती केतन अग्रवाल यांच्या मृत्यू प्रकरणात तपासादरम्यान नवे खुलासे समोर येत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल हिने पोलिसांच्या चौकशीत काही महत्त्वाची माहिती दिल्याचे समोर आले आहे. तपास यंत्रणांकडून तिच्या जबाबाची पडताळणी केली जात असून या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचे लग्न ठरले होते. दोन्ही कुटुंबांच्या संमतीने हा विवाह निश्चित झाला होता. मात्र, सियाला हे लग्न मान्य नसल्याचे चौकशीत समोर आले आहे. तिचे चेतन चौधरीसोबत प्रेमसंबंध असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. याच कारणातून पुढे वाद निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. तपासादरम्यान पोलिसांना असेही आढळले की, घटनेपूर्वी आरोपींनी एकापेक्षा अधिक वेळा योजना आखल्याचा संशय आहे. अखेर सियाने वाढदिवसाच्या निमित्ताने केतनला लोहगड किल्ल्यावर नेले. त्यानंतर घडलेल्या घटनेत केतनचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा अपघात असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र पुढील तपासात पोलिसांना संशय आल्याने तपासाची दिशा बदलली. चौकशीदरम्यान सियाने केतनबाबत वैयक्तिक नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे. केतन तोतरे बोलत होता आणि डोक्यावर विग वापरत असल्यामुळे तो आपल्याला पसंत नव्हता, असे तिने पोलिसांना सांगितल्याचे वृत्त आहे. तसेच चेतन चौधरीनेच केतनला संपवण्यासाठी आपल्यावर दबाव टाकल्याचाही दावा तिने केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुलाला केसांचा पॅच असल्याची माहिती लग्न ठरण्यापूर्वीच सियाच्या कुटुंबाला दिली होती, असे स्पष्ट केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले निर्देश

# केतन अग्रवाल खटल्यात उज्वल निकम यांची एन्ट्री; प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुण्यातील लोहगड किल्ल्यावर झालेल्या तरुण व्यावसायिक केतन अग्रवाल हत्याकांडाचा खटला आता फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला जाणार आहे. या संवेदनशील प्रकरणात गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले आहेत. ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांनीही या खटल्याचे काम पाहण्यासाठी आपली संमती दर्शवली आहे.

केतन अग्रवाल यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी शुक्रवारी पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या मुलासाठी न्याय मागितला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी पीडित कुटुंबाला धीर देत, दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, त्यांना फाशीचीच शिक्षा मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही दिली. अग्रवाल कुटुंबाने हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची आणि उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्र्यांनी तात्काळ मान्य करत विधि व न्याय विभागाच्या सचिवांना यासंबंधीचे आदेश जारी करण्याचे निर्देश दिले.



२६ वर्षीय तरुण व्यावसायिक केतन अग्रवाल याचा १८ जून २०२६ रोजी लोहगड किल्ल्याच्या खोल दरीत कोसळून मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा अपघाती मृत्यू असल्याचा बनाव रचण्यात आला होता, परंतु पुणे पोलिसांनी केलेल्या सखोल तांत्रिक तपासानंतर यामागील हत्येचा कट उघडकीस आला. केतन अग्रवाल यांचा साखरपुडा सिया गोयल हिच्याशी झाला होता आणि नोव्हेंबर २०२६ मध्ये त्यांचा विवाह होणार होता. मात्र, सियाचे चेतन चौधरी नावाच्या तरुणाशी प्रेमसंबंध होते. कुटुंबाच्या भीतीपोटी पळून जाण्याऐवजी या दोघांनी केतनलाच कायमचे वाटेतून हटवण्याचा क्रूर कट रचला. १८ जून रोजी सिया केतनला घेऊन लोहगड किल्ल्यावर गेली. तिथे चेतन आधीपासूनच दबा धरून बसला होता. सियाने इशारा करताच चेतनने केतनला मागून खोल दरीत ढकलून दिले. पोलीस तपासात समोर आलेल्या बाबी

केतनला मारण्याचा हा त्यांचा पहिला प्रयत्न नव्हता. यापूर्वीही त्यांनी अनेकदा कट रचला होता. एका ट्रेक दरम्यान सियाने केतनला दरीच्या दिशेने ढकलले होते, मात्र केतन झाडाझुडपांचा आसरा मिळाल्याने सुदैवाने वाचला. त्या वेळी सियाने 'तुला सापापासून वाचवण्यासाठी ढकलले' अशी खोटी कहाणी रचून केतनचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर दुसऱ्यांदा केलेला प्रयत्नही अयशस्वी ठरला होता, मात्र १८ जून रोजी त्यांचे प्रयत्न सफल झाले.



संपादकीय....

## बाधित शेतकऱ्यांना मदत

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेत मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने संवाद साधत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी विशेष पाठपुरावा केला. पंचनामे, प्रस्ताव सादरीकरण आणि निधी मंजुरीची प्रक्रिया वेगाने पूर्ण व्हावी यासाठी त्यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले होते. त्यामुळे अल्पावधीतच मदतीचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा मार्ग मोकळा झाला.नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेत नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत देणे नव्हे, तर त्यांना पुन्हा उभारी देऊन शेती पुनर्बांधणीसाठी सक्षम करणे हे शासनाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सातत्याने अधोरेखित केले आहे. एप्रिल व मे २०२६ या कालावधीत राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिके तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने ३३४ कोटी ९८ लाख रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली असून यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, नुकसानग्रस्तांना वेळेत आधार मिळावा आणि शेती पुनर्बांधणीला बळ मिळावे, या भूमिकेतून मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय मार्गी लागला आहे.शासन निर्णयानुसार राज्यातील २ लाख ६७ हजार ६५६ शेतकरी आणि १ लाख ६३ हजार ७८८.७५ हेक्टर क्षेत्र अवकाळी पावसामुळे बाधित झाले असून त्यांच्यासाठी ही मदत मंजूर करण्यात आली आहे. पुणे विभागातील सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ३,७६२ शेतकरी व २,२४१.३० हेक्टर क्षेत्रासाठी ४ कोटी ३१ लाख १ हजार रुपये मदत मंजूर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी विशेष पुढाकार घेतला. राज्यातील शेतकरी संकटातून सावरण्यासाठी आवश्यक असलेली मदत वेळेत उपलब्ध व्हावी, या भूमिकेतून शासन स्तरावर तातडीने कार्यवाही करण्यात आली.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

कर्जमुक्ती योजना काय आहे :-

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

एकवेळ समझोता योजना (जपश ढळाश डशीींश्रशाशपीं):

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

प्रोत्साहनपर लाभ :

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा:

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (जढड) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

योजनेचे निकष :

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.

३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

जमीन धारणेची अट नाही.

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

कोण पात्र असणार नाहीत :

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती

निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक

मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– काशीबाई थोरात,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# भेसळीविरोधातील लढाईत प्रयोगशाळा विश्वासाहता : न्यायव्यवस्थेची खरी परीक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ आणि अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात भेसळयुक्त औषधे, दुग्धजन्य पदार्थ, कृत्रिमरीत्या पिकवलेली फळे आणि तंबाखूजन्य पदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. या मोहिमेचे विधानसभेत विरोधी पक्षनेते नाना पाटोळे यांनी अभिनंदन केले. मात्र, त्याच वेळी त्यांनी एक गंभीर आरोपही केला. तपासासाठी गोळा करण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये प्रयोगशाळा स्तरावर फेरफार होतो आणि त्यामुळे अनेक आरोपी न्यायालयातून निर्दोष सुटतात, असा दावा त्यांनी सभागृहात मांडला. तसेच प्रयोगशाळा अद्ययावत करण्यासाठी आणि तेथील कथित गैरव्यवहार रोखण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. या आरोपांची सत्यता सक्षम चौकशी किंवा न्यायालयीन प्रक्रियेतूनच निश्चित होऊ शकते. परंतु या निमित्ताने एक महत्त्वाचा प्रश्न समोर आला आहे- प्रयोगशाळेची विश्वासार्हता नेमकी कशी ठरते?

भेसळविरोधी कारवाई म्हणजे केवळ धाड टाकणे आणि माल जप्त करणे एवढाच विषय नाही. धाडीनंतर तपासासाठी नमुने घेतले जातात. अन्नाच्या नमुन्यांसाठी अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६ तर औषधांच्या नमुन्यांसाठी औषधे आणि सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० यांनुसार प्रक्रिया निश्चित करण्यात आलेली आहे. नमुना योग्य पद्धतीने गोळा करणे, सीलबंद करणे, त्याची नोंद ठेवणे आणि अधिकृत प्रयोगशाळेत पाठविणे या प्रत्येक टप्प्याला कायदेशीर महत्त्व असते. न्यायालयात दोष सिद्ध करण्यासाठी प्रयोगशाळेचा अहवाल हा सर्वात महत्त्वाचा वैज्ञानिक पुरावा असतो.

प्रयोगशाळेची विश्वासार्हता ही व्यक्तीवर नव्हे तर प्रणालीवर अवलंबून असते. चाचणीसाठी वापरली जाणारी पद्धत वैज्ञानिकदृष्ट्या मान्यताप्राप्त असावी, उपकरणांचे नियमित अचूकता प्रमाणीकरण झालेले असावे, रसायनांची गुणवत्ता प्रमाणित असावी, तपासणी करणारे अधिकारी प्रशिक्षित असावेत आणि प्रत्येक प्रक्रियेची लेखी व डिजिटल नोंद उपलब्ध असावी. भारतातील अनेक प्रयोगशाळांना एनएबीएल (NABL) अर्थात राष्ट्रीय चाचणी व अचूकता प्रमाणीकरण प्रयोगशाळा मान्यता मंडळाची मान्यता प्राप्त असते. ही मान्यता मिळण्यासाठी प्रयोगशाळेला कठोर गुणवत्ता निकष, तांत्रिक क्षमता आणि नियमित लेखापरीक्षणातून जावे लागते. अर्थात, एनएबीएल मान्यता म्हणजे प्रत्येक अहवाल आपोआप अचूक ठरेल, अशी हमी नसली तरी ती गुणवत्ता व्यवस्थेवरील विश्वास वाढवते.

या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे पुराव्यांची अखंड साखळी. नमुना कोणी घेतला, कधी घेतला, कोणत्या सीलने बंद केला, तो कोणाकडे सुपूर्द झाला, प्रयोगशाळेत कधी पोहोचला, कोणत्या विश्लेषकाने तपासला आणि अहवाल कोणी मंजूर केला, याची प्रत्येक टप्प्यावर नोंद असते. ही साखळी तुटली किंवा दस्तऐवजीकरणात त्रुटी राहिली, तर बचाव पक्ष न्यायालयात त्या पुराव्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित करू शकतो.

मग प्रयोगशाळेत हेराफेरी होऊ शकते का? सैद्धांतिकदृष्ट्या कोणत्याही व्यवस्थेत गैरव्यवहाराची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. परंतु प्रत्येक संशय म्हणजे फेरफार असेही मानता येणार नाही. नमुन्यांचे चुकीचे लेबलिंग, मानवी चुका, उपकरणातील बिघाड, अपुरे प्रशिक्षण किंवा प्रक्रियात्मक त्रुटी यांमुळेही अहवालावर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, जाणूनबुजून नमुना बदलणे, अहवालात अनधिकृत बदल करणे किंवा पुराव्याशी छेडछाड करणे हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे कृत्य आहे. अशा आरोपांची पुष्टी केवळ सक्षम चौकशी आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच होऊ शकते.

भारतात अशा घटना किती प्रमाणात घडतात, याची अधिकृत राष्ट्रीय आकडेवारी उपलब्ध नाही. काही न्यायालयीन प्रकरणांमध्ये नमुना संकलन, साठवण किंवा तपास प्रक्रियेतील त्रुटींवर न्यायालयांनी निरीक्षणे नोंदविली आहेत. मात्र त्यावरून संपूर्ण प्रयोगशाळा व्यवस्था अविश्वसनीय आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. देशातील बहुसंख्य सरकारी आणि मान्यताप्राप्त प्रयोगशाळा नियमितपणे गुणवत्ता निकषांचे पालन करून काम करतात. त्यामुळे व्यवस्था नाकारण्यापेक्षा तिची विश्वासार्हता अधिक बळकट करण्याची गरज आहे.

जर सरकारी पुराव्यात जाणूनबुजून फेरफार झाल्याचे सिद्ध झाले, तर संबंधित व्यक्तींवर विभागीय कारवाईबरोबरच लागू कायद्यांनुसार फौजदारी गुन्हेही दाखल होऊ शकतात. शिक्षेचे स्वरूप प्रकरणाच्या स्वरूपावर, उपलब्ध पुराव्यांवर आणि संबंधित कायद्यांवर अवलंबून असते. न्यायप्रक्रियेत पुराव्याशी छेडछाड ही अत्यंत गंभीर बाब मानली जाते.

यापुढे प्रयोगशाळा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी काही ठोस उपाय आवश्यक आहेत. प्रत्येक नमुन्याला त्वरित प्रतिसाद संकेत (टठ उेवश) किंवा दंड संकेत (इरीलेवश) देऊन त्याचा संपूर्ण प्रवास डिजिटल स्वरूपात नोंदवणे, प्रयोगशाळा माहिती व्यवस्थापन प्रणाली (एलआयएमएस) वापरणे, प्रयोगशाळांमध्ये सीसीटीव्ही देखरेख ठेवणे, प्रत्येक प्रक्रियेची डिजिटल नोंदवही (ऑडिट ट्रेल) तयार करणे, संवेदनशील प्रकरणांमध्ये दुसऱ्या स्वतंत्र प्रयोगशाळेकडून पुनर्तपासणी करणे, उपकरणांचे नियमित प्रमाणीकरण, वेळेत अहवाल सादर करणे, प्रयोगशाळांचे स्वतंत्र वार्षिक लेखापरीक्षण आणि कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण या सुधारणा राबविल्या तर प्रणालीवरील विश्वास अधिक दृढ होईल.

नागरिकांनी प्रयोगशाळांवर विश्वास ठेवावा का? नक्कीच ठेवावा. कारण विज्ञान आणि न्यायव्यवस्था यांचा पाया विश्वासार्ह वैज्ञानिक पुराव्यावर उभा आहे. मात्र हा विश्वास कायम ठेवण्यासाठी प्रयोगशाळांनीही पारदर्शकता, गुणवत्ता आणि उत्तरदायित्व या तत्त्वांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. विश्वास हा केवळ कायद्याने निर्माण होत नाही; तो सातत्यपूर्ण, निष्पक्ष आणि अचूक कामगिरीतून निर्माण होतो.

नाना पाटोळे यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा केवळ राजकीय आरोप म्हणून बाजूला सारण्याचा किंवा तो सिद्ध झालेला आहे असे गृहीत धरण्याचा विषय नाही. उलट, तो प्रयोगशाळा व्यवस्थेची गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची संधी आहे. शासनाने या मुद्द्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहून आवश्यक सुधारणा केल्या, तर त्याचा लाभ केवळ न्यायव्यवस्थेलाच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याला आणि ग्राहक संरक्षणालाही होईल.

भेसळविरोधातील लढाईचा खरा विजय धाडीत नाही, तर न्यायालयात दोषींना शिक्षा होण्यात आहे. धाड टाकणारा अधिकारी गुन्हा उघड करतो; पण त्या गुन्ह्याला न्यायालयात सिद्ध करणारी विश्वासार्ह प्रयोगशाळाच त्या कारवाईला अंतिम अर्थ देते. म्हणूनच भेसळविरोधातील लढाईतील सर्वात प्रभावी शस्त्र म्हणजे निष्पक्ष, सक्षम आणि विश्वासार्ह प्रयोगशाळा व्यवस्था हे आहेत.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय**
**दापोली जिल्हा रत्नागिरी.**

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्याय, शिक्षण आणि समतेचे युगपुरुष



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजव्यवस्थेत सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणाऱ्या महान राजकर्त्यांमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी केवळ कोल्हापूर संस्थानाचे राज्यकारभार यशस्वीपणे सांभाळला नाही, तर बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी अनेक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय घेतले. महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचा पाया मजबूत करण्यामध्ये शाहू महाराजांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

शाहू महाराजांचा ठाम विश्वास होता की शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. म्हणूनच त्यांनी सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. गरीब, शेतकरी, कामगार आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण आणि इतर अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. शिक्षण हा काही मोजक्या लोकांचा अधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे, ही त्यांची भूमिका होती.

सामाजिक समतेसाठी त्यांनी अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमता याविरुद्ध कठोर भूमिका घेतली. सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा आणि इतर सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली करण्याचे निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या राज्यात गुणवत्तेला आणि समान संधीला महत्त्व देण्यात आले.

सन १९०२ मध्ये त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय समाजासाठी ५० टक्के आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा केली. हा निर्णय भारतीय सामाजिक न्यायाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानला जातो. आजच्या आरक्षण धोरणाचा पाया शाहू महाराजांच्या या दूरदृष्टीत दिसून येतो.

महिलांच्या शिक्षणाला आणि सन्मानाला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण आणि महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी त्यांनी अनेक सुधारणा राबवल्या. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळाल्याशिवाय राष्ट्राची खरी प्रगती होऊ शकत नाही, ही त्यांची धारणा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला शाहू महाराजांनी वेळोवेळी पाठिंबा दिला. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या नव्या नेतृत्वाला त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे फुले शाहू आंबेडकर ही विचारपरंपरा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा मजबूत पाया ठरली.

आजच्या काळात शिक्षणातील समान संधी, संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि बंधुता या संकल्पना अधिक बळकट करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांचे विचार प्रेरणादायी आहेत. त्यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आधुनिक भारताच्या लोकशाही मूल्यांना दिशा देणारे आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे जीवन आपल्याला शिकवते की समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, शिक्षण आणि विकास पोहोचविणे हीच खरी लोकसेवा आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श स्वीकारून समताधिष्ठित, शिक्षित आणि न्यायपूर्ण समाज घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**– प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे**
**राज्य समन्वयक, फुले-आंबेडकर**
**विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वासिंदच्या 'न्यू आयडीअल' शाळेवर अतिरिक्त शुल्क वसुलीचे गंभीर आरोप

## शैक्षणिक फी व्यतिरिक्त पैशांची सक्ती; संतप्त पालकांची शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार, कारवाईची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वासिंद येथील 'न्यू आयडीअल स्कूल'मध्ये नियमित शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रकमेची सक्ती केली जात असल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला असून, या प्रकरणामुळे परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शाळा प्रशासनाकडून विविध कारणे पुढे करून दरवर्षी अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याचा दावा पालकांनी केला असून, याविरोधात त्यांनी शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेकडून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून निर्धारित शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त विविध बाबींच्या नावाखाली अतिरिक्त रकमेची मागणी केली जाते. विशेष म्हणजे, या रकमेबाबत अधिकृत पावती दिली जात नसल्याचा आरोपही पालकांनी केला आहे. त्यामुळे या वसुलीची कोणतीही अधिकृत नोंद राहत नसल्याने पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालकांच्या तक्रारीनुसार, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमानुसार शाळेला आकारण्यात येणाऱ्या प्रत्येक शुल्काची अधिकृत पावती देणे बंधनकारक आहे. मात्र, शाळा प्रशासनाकडून या नियमाचे उल्लंघन होत असून अतिरिक्त शुल्काची पावती दिली जात नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.




याशिवाय, अतिरिक्त पैसे भरण्यास नकार देणाऱ्या किंवा शुल्क भरण्यास विलंब करणाऱ्या पालकांवर मानसिक दबाव टाकला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही पालकांनी नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या भीतीपोटी अनेक पालक नाइलाजाने अतिरिक्त रक्कम भरत होते. मात्र, शाळेची मनमानी आता सहनशक्तीच्या पलीकडे गेल्याने त्यांनी एकत्र येऊन प्रशासनाकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला.

पालकांनी उपस्थित केलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये बेकायदेशीर शुल्क वसुली, अतिरिक्त रकमेबाबत पावती न देणे, तसेच शुल्कासाठी पालकांवर मानसिक व आर्थिक दबाव टाकणे यांचा समावेश आहे. यामुळे शाळेच्या आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शाळा प्रशासनाच्या कथित मनमानी कारभाराला कंटाळून पालकांनी पुराव्यांसह शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार सादर केली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या तक्रारीनंतर शिक्षण विभाग कोणती भूमिका घेतो आणि शाळा प्रशासनाविरुद्ध कोणती कारवाई केली जाते, याकडे पालकांसह संपूर्ण वासिंद परिसराचे लक्ष लागले आहे. जर संबंधित प्रकरणात तातडीने आणि प्रभावी कारवाई झाली नाही, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही पालकांनी दिला आहे.

या प्रकरणामुळे खासगी शाळांमधील शुल्क आकारणीच्या पद्धती, नियमांचे पालन आणि पालकांच्या हक्कांविषयी पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# ग्रामपंचायत गोगांव येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्रामपंचायत गोगांव येथे आदर्श राज्यकर्ते, थोर समाजसुधारक आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, चितानंद सोनकांबळे, अमृत पाटील यासह मान्यवर उपस्थिती होते



यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की, समाजातील वंचित, शोषित आणि दुर्लक्षित घटकांच्या विकासासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. शिक्षण सर्वांसाठी खुले व्हावे, समाजात समानता निर्माण व्हावी आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू करून सामाजिक भक्कम पाया रचला.

स्त्री शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्यता निर्मूलन, तसेच शेतकरी आणि कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य भावी पिढ्यांना नेहमीच दिशा देत राहील. यावेळी रोहन जगताप, दत्ता गायकवाड, खाजपा गायकवाड आदी उपस्थिती होते.

# राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श घ्यावा : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राजर्षी शाहू महाराज यांनी दुर्बल, वंचित समाजाच्या उन्नतीसाठी चौफेर कार्य केले, त्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित झाली. समाजपरिवर्तन देखील जलद गतीने झाले, म्हणून त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन एकसंघ समाजाची निर्मिती केली पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सिद्धाराम पाटील उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम**

पुढे बोलताना ते म्हणाले की, शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण लागू करून सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल उचलले. त्यांनी अस्पृश्यता, जातिभेद आणि सामाजिक विषमता यांना विरोध केला.स्त्री शिक्षण आणि बालविवाह, अंधश्रद्धा आणि सामाजिक रूढींविरुद्ध जनजागृती केली. महिलांना स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून दिली, शेतकरी आणि कामगारांच्या कल्याणासाठी उपाययोजना केल्या.म्हणूनच त्यांचे कार्य वंदनीय आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केली सूत्रसंचलन प्रा जनाबाई चौधरी यांनी केले, आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा शितल फुटाणे, प्रा शितल टिंगरे, शिवकुमार मठदेवरु, ऐश्वर्या तारापुरे, प्रा शितल झीगाडे उपस्थित होते.

# टाकळीवाडीत भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ : गावात भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

गेल्या काही दिवसांत अनेक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याने ते जखमी झाले असून काहींना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करावे लागले आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तसेच महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणेही धोकादायक ठरत आहे.

ग्रामस्थांनी संबंधित प्रशासन व ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा तक्रारी केल्या असून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

याबाबत ग्रामपंचायत व संबंधित विभागाने योग्य ती कार्यवाही करून भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# शिक्षण हीच खरी संपत्ती असून ती कधीही नष्ट होत नाही : कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : शिक्षणामुळे माणसामध्ये आत्मविश्वास, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होते.अशी व्यक्ती स्वतःचा विकास साधतानाच समाजाच्या प्रगतीतही महत्त्वाचे योगदान देते. आज विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, आरोग्य अशा सर्व क्षेत्रांमध्ये झालेली प्रगती ही शिक्षणामुळेच शक्य झाली आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या ज्ञानात भर पडते, विचारसरणी विकसित होते आणि जीवनातील योग्य-अयोग्य गोष्टींची जाणीव निर्माण होते.शिका,पुढे चला आणि समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्या हा संदेश प्रत्येकाने आचरणात आणला पाहिजे. शेवटी,शिक्षण हीच खरी संपत्ती असून ती कधीही नष्ट होत नसल्याचे प्रतिपादन कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे यांनी न्यू इंग्लिश स्कूल पालखेड विद्यालयातील नूतन इमारतीच्या उद्घाटनाप्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून नूतन इमारतीचे उद्घाटन कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे यांच्या हस्ते करण्यात येऊन नूतन इमारत विद्यार्थ्यांच्या सेवेत समर्पित केली.

**पालखेड विद्यालयाचे नुतन इमारतीचे दत्तात्रेय जोंधळे यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन**

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे, सौ योगिताताई दत्तात्रेय जोंधळे,माजी चेअरमन बाबासाहेब शिंदे, रावसाहेब शिंदे, बाळासाहेब थेटे, भाऊसाहेब थेटे, संजय थेटे, ज्ञानेश्वर जाधव, माजी मुख्याध्यापक दत्तराम थेटे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मंगेश छाजेड, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, उपाध्यक्ष रवींद्र कोकाटे,शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ कोकाटे, उदय दीक्षित,माणिक शिंदे,मधुकर आहेर, दिलीप शिरवाडकर,आवारे साहेब,ज्ञानेश्वर कोकाटे,सोमनाथ पवार, मच्छिंद्र मिस्त्री,मनीषा ताजणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक शेळके, कैलास गवळी आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना दत्तात्रय जोंधळे यांनी पालखेड पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व आधुनिक भौतिक,शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देश असल्याचे सांगून येथून घडणारे विद्यार्थी समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका नक्कीच बजावतील असे सांगितले.कार्यक्रमास मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे,दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे,सुनंदा दुर्दवळे,संजय लव्हंगडे, मंगेश कागदे,शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव,राजेंद्र नाठे,संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावंत जाधव,संजय कोकतरे, ज्ञानेश्वर मातेरे, कविता ढोमसे, सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे,रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह शिक्षणप्रेमी, पालक, ग्रामस्थ, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक करून नूतन इमारतीमुळे विद्यार्थ्यांना प्रशस्त वर्गखोल्या, आधुनिक सुविधा व शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे.या उपक्रमामुळे परिसरातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**मध्य रेल्वेच्या महाप्रबंधकांकडे विविध मागण्या**

# उज्जैन-इंदोर, मडगाव, देहूरोड, मुंबईसाठी नव्या रेल्वे गाड्या सुरू करा : प्रणव परिचारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातील प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी तसेच लाखो भाविकांच्या सोयीसाठी विविध नवीन रेल्वे सेवा सुरू कराव्यात, काही महत्त्वाच्या गाड्यांचा विस्तार करावा तसेच पंढरपूर रेल्वे स्थानकावरील मूलभूत सुविधांमध्ये वाढ करावी, अशी मागणी भाजप नेते तथा सदस्य, क्षेत्रीय रेल उपयोगकर्ता परामर्श दात्री समिती, मुंबईचे सदस्य ॲड. प्रणव परिचारक यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे केली आहे.



मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव व मंडल रेल प्रबंधक सुजित मिश्रा यांनी पंढरपूर रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी ॲड. परिचारक यांनी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

पंढरपूर-पुणे-देहूरोड अथवा पनवेलपर्यंत नवीन दैनिक इंटरसिटी अथवा एक्सप्रेस सुरू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. ही गाडी पंढरपूर, आळंदी व देहूरोड या धार्मिक स्थळांना जोडणारी ठरणार असून विद्यार्थी, नोकरदार व भाविकांसाठी ती उपयुक्त ठरेल, असे परिचारक यांनी सांगितले.

तसेच, कोल्हापूर-सोलापूर-कोल्हापूर साप्ताहिक रेल्वे सेवा दर गुरुवारी सहा महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. कोल्हापूर येथे गुरुवारी विनावापर असलेल्या रेकचा या सेवेसाठी वापर करता येऊ शकतो, असेही त्यांनी सुचविले.

पंढरपूर-कुर्डुवाडी मार्गावर लोकल सेवा सुरू करून कुर्डुवाडी जंक्शनमार्गे देशातील विविध भागांशी पंढरपूरची कनेक्टिव्हिटी वाढविण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय, गाडी क्रमांक २२९४३/२२९४४ दौंड-इंदौर एक्सप्रेस पंढरपूरपर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या सेवेमुळे सोलापूर जिल्ह्यातील प्रवाशांना उज्जैन, इंदौर, सुरत व वडोदरा येथे थेट रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे.

सध्या आठवड्यातून तीन दिवस धावणारी पंढरपूर-दादर एक्सप्रेस दैनिक स्वरूपात सुरू करावी, अशीही मागणी करण्यात आली. गोवा, कोकण व कर्नाटकातून पंढरपूरला येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मडगाव-मिरज-पंढरपूर साप्ताहिक एक्सप्रेस सुरू करण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला. गोवा भवन उभारण्याच्या प्रस्तावामुळे या मागणीला विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे परिचारक यांनी नमूद केले.

स्थानकावरील सुविधांबाबत पंढरपूर रेल्वे स्थानकावर वृत्तपत्र व पुस्तक विक्री केंद्र, प्रधानमंत्री जनऔषधी केंद्र अथवा वैद्यकीय दुकान सुरू करावे, संपूर्ण स्थानक परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारावी, तसेच अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन किमान दोन नवीन प्लॅटफॉर्म उभारून त्यावर लिफ्टसह आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही अपेक्षा परिचारक यांनी व्यक्त केली. या सर्व मागण्यांवर रेल्वे प्रशासनाशी सकारात्मक चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

# अन्नदात्यांसाठी आमदार पवारांची पंढरपुरात घोषणाबाजी....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शासनाने शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी करावी अन्यथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करू देणार नाही.



असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. अन्नदात्या शेतकऱ्यांसाठी आपण हे आंदोलन करीत आहोत. हा इशारा त्यांच्यासाठी दिला आहे. राज्यातील शासन शेतकऱ्याची फसवणूक करत असल्याचे त्यांनी आरोप केला.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांना विना आठ दोन लाखापर्यंत कर्ज माफ करण्यात यावे या मागणीसाठी काही दिवसांपूर्वी आमदार रोहित पवार यांनी त्यांनी अन्य आंदोलन केले होते. चार दिवसानंतर भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांनी पंढरपूरला येऊन आमदार रोहित पवार यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक घेऊन शेतकऱ्यांना लवकरच कर्जमाफी देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री बरोबर बैठक झाली नाही त्यामुळे आमदार रोहित पवार यांनी अन्नदाता एल्गार मेळावा घेण्याचा त्यांनी याची सुरुवात त्यांनी विठ्ठल रुक्मिणी दर्शन घेऊन केली आहे.

बुधवारी आमदार रोहित पवार पंढरपुरात आले होते. त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, विठ्ठलाला साखळी घालून आपण अन्नदात यलगार सुरू केला आहे. २९ जून रोजी छत्रपती संभाजी नगर येथे एल्गार मेळावा होणार आहे. या अगोदर मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी करावी अन्यथा मुख्यमंत्री फडणवीस यांना श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यास रोखण्यात येईल. असा इशारा त्यांनी दिला आहे. आमदार रोहित पवार यांची संत बाजी आंदोलन सुरू असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह. ह.भ.प. जळगावकर महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख आदी उपस्थित होते.

# महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील विकासकामांची आयुक्तांकडून पाहणी

## संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या महत्त्वाच्या सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील विविध विकासकामांचा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. विकास निधी तसेच एनटीपीसीच्या सीएसआर निधीतून सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता, प्रगती आणि पूर्ततेचा कालावधी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यावेळी पूर नियंत्रण, स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी अतिक्रमण नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती, विभागीय अधिकारी जावेद पानगल, डॉ. सतीश चौगुले, गोकुळ चिंतारे, अविनाश वाघमारे, चेतन प्रचंडे, स्वप्नील सोलणंकर, अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान आयुक्तांनी म ेरांसाठीउभारण्यात आलेल्या नव्या पिंजऱ्याची तसेच वाघ आणि बिबट्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक पिंजऱ्यांची पाहणी केली. एनटीपीसीच्या सीए-सआर निधीतून प्राण्यांसाठी उभारण्यात आलेल्या विशेष निवाऱ्यांचाही त्यांनी आढावा घेतला. सर्व विकासकामे दर्जेदार आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

संग्रहालयाशेजारील मैदानात वाढलेली वेडी बाभळीची झाडे मुळासकट काढून परिसर स्वच्छ आणि सुशोभित करण्याचे आदेशही त्यांनी दिले. प्राणी संग्रहालय परिसरातील स्वच्छतेबाबत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. पाहणी-वेळी परिसरातील एका विहिरीवर रेल्वे प्रशासनाकडून दावा करण्यात येत असल्याची बाब समोर आली. याबाबत संबंधित जागेच्या मालकी हक्काची माहिती रेल्वे प्रशासनाकडून अधिकृत पत्राद्वारे मागविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय हे शहरातील महत्त्वाचे पर्यावरणीय आणि पर्यटनस्थळ आहे. येथे सुरू असलेली विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे. प्राण्यांच्या सुरक्षिततेबरोबरच नागरिकांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून पूर नियंत्रण, स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनाला प्राधान्य दिले जाईल, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. आधार हॉस्पिटल ते मंदिर परिसरादरम्यानच्या रस्त्यालगत आणि महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील सर्व अतिक्रमणे तात्काळ हटविण्याचे आदेश देण्यात आले. अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचनाही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिल्या. प्राणी संग्रहालय परिसरात यापूर्वी पाणी साचल्याच्या घटनांची दखल घेत आयुक्तांनी संग्रहालयालगतच्या नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण युद्धपातळीवर करण्याचे आदेश दिले. पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत राहून पूरस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# पंढरपुरात अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याच्या हालचालीस वेग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील व तालुक्यातील नागरिकांना व शेतकऱ्यांना विविध कामांसाठी सोलापूर जिल्हा येथे जावे लागत असते. शेतकऱ्यांचा व नागरिकांचा वेळ व पैसा वाया जातो त्यासाठी म्हणून पंढरपुरात अप्पर जिल्हाधिकारी सुरू करण्यात यावे, अशी मागणी अनेक वर्षापासून होत होती याची दखल शासनाने घेतली. म्हणून पंढरपुरात अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी १२ जुलै पर्यंत सूचना पाठवण्याचे सूचना देण्यात आले आहे. पंढरपूर हे सहा तालुक्याचे शहर असून येथील शेतकरी व नागरिकांना पंढरपूरला येण्याची चांगली सोय होणार आहे वेळ व पैशाची बचत होणार आहे. शासनाने पंढरपूरला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय करण्याची परवानगी दिली आहे. कार्यालय सुरू करण्याच्या शासन स्तरावर हालचाली सुरू झाले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयास १२ जुलै पर्यंत आपल्या सूचना पुणे येथे आयुक्त कार्यालयास पाठवून द्यावी. अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. एकंदरीत पंढरपुरात अप्पर जिल्हाधिकार्यालय सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाले आहेत.

**या तालुक्यांचा होणार समावेश, पंढरपूर येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये पंढरपूर, माळशिरस, माढा, करमाळा, मंगळवेढा, सांगोला, मोहोळ, या सात तालुक्याचा समावेश करण्यात येणार आहे.**

# धाराशिव पोलिसांची मोठी कारवाई; कळंब येथे तब्बल ५९ लाखांचा अवैध गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य साठा जप्त!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खाखर व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच परी. पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कळंब पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली.

दि. २४/०६/२०२६ रोजी या मोहिमेदरम्यान परी. पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत डीकसव (ता. कळंब) येथील प्रभाकर भैरुबा चौधरी यांच्या घरातील एका खोलीवर छापा टाकला. सदर ठिकाणी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला व मानवी आरोग्यास अपायकारक ठरणारा गुटखा तसेच विविध तंबाखूजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला.

यावबत घरमालक प्रभाकर चौधरी यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी सदर खोली मागील एक महिन्यापासून गणेश भिकाजी घेवारे (रा. डीकसव, ता. कळंब) यांना भाडेतत्त्वावर दिल्याचे सांगितले. पुढील चौकशीत जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित साठा हा गणेश घेवारे यांचाच असल्याचे निष्पन्न झाले.



सदर छाप्यात दोन पंचांसमक्ष खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे:

छाप्यामध्ये सम्राट पान साला ३२४० पुडे, गोवा १०००गुटखा ९०४० पुडे, तारा सुगंधित पान मसाला १२४८, signature pan masala ४५८ पुडे, action7 scented tobacco८१७ पुडे, ज्ञ.ठ. १०००गुटखा ५१८ पुडे, रत्नछाप NO300SCENTED TOBCCO२२४ पुडे, माणिकचंद पान मसाला ७७८पुडे, शिमला गुटखा ६०० पुडे, LCC1000ZFRNI ZRD ७४८ पुडे, MC scented tobacco ९०० पुडे, B scented tobacco250 पुडे,अलीबाबा पान मसाला २२५ पुडे, TTS scented tobacco१०३५ पुडे,UNLBELED scented tobacco ६६५ पुडे, तढ ीलशपींशव ेंलरलले ५० पुडे, जायका १००० गुटखा६० पुडे, SOCIETY PN MSL50 पुडे, RKWORLD scented tobacco ४० पुडे, ORIGINL300 scented tobacco २६ पुडे विविध कंपन्यांचा गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ असा एकूण ₹५९,२३,१२८/- (अक्षरी रुपये एकोणसाठ लाख तेवीस हजार एकशे अठ्ठावीस मात्र) किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेला सर्व मुद्देमाल पोलीस ठाणे कळंब येथे जमा करण्यात आला असून, अन्न सुरक्षा व मानके कायद्यान्वये पुढील कायदेशीर कारवाईसाठी मा. अन्न व औषध प्रशासन, धाराशिव यांच्याकडे आवश्यक अहवाल सादर करण्यात आला आहे.

कारवाईत सहभागी पथक परी. पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या यशस्वी कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण सोमवंशी, श्री. सुरेश कासुळे, पोलीस उपनिरीक्षक श्री. रामचंद्र बहुरे, श्री. सिराज पठाण तसेच RCP, QRT पथकातील अधिकारी-कर्मचारी आणि कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार यांनी मोलाची भूमिका बजावली.

# निफाड नगरपंचायतीच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यासाठी स्वच्छता सुरक्षिततेबाबत कार्यशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतमार्फत स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, आरोग्य संरक्षण तसेच आधुनिक आणि सुरक्षित स्वच्छता व्यवस्थापन पद्धतींचा प्रसार करण्याच्या उद्देशाने सांडपाणी व सेप्टिक टँक स्वच्छता सुरक्षितता या विषयावर विशेष कार्यशाळा घेण्यात आली. मुख्याधिकारी धिरज भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली व सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयांतर्गत कार्यरत एनएसकेएफडीसी अंतर्गत डॉ. स्मिता सिंग, मुख्य कार्यकारी अधिकारी, काम फौंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने कार्यशाळा घेण्यात आली. यात सांडपाणी वाहिन्या सिव्हर व सेप्टिक टँक स्वच्छतेबाबत उद्भवणारे धोके, सुरक्षित कामकाज पद्धती, वैयक्तिक सुरक्षा उपकरणांचा पीपीई वापर, यांत्रिक स्वच्छतेचे महत्त्व, कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नगरपंचायत चे स्वच्छता प्रमुख निलेश ठाकूर, स्वच्छता निरीक्षक विनोद त्रिभुवन, शहर समन्वयक दिपाली गिते, मुकादम सुनील गांगुर्डे ,बिलाल पठाण आणि सर्व महिला व पुरुष सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# हुतात्मा बाबुराव बोरगावकर माध्यमिक शाळांच्या विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर १००% पास योजनेला १००% प्रतिसाद वाहातूक नियंत्रकांचे कौतुक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथील तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखाना साईट हुतात्मा बाबुराव बोरगावकर माध्यमिक शाळा कारखाना येथील विद्यार्थिनींना बस स्थानकातील वाहतूक नियंत्रकांच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण शैक्षणिक समूहात वाटचाल व्हावी आणि विद्यार्थिनीचा शैक्षणिक विकास व्हावा यासाठी अहिल्यादेवी होळकर १००% पास योजना राबवण्यात आली असून यावेळी शंभर टक्के प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.




विभाग नियंत्रक अजय पाटील , विभागीय वाहतूक अधिकारी मधुरा जाधवर, आगार प्रमुख तुळजापूर महेश रामपुरे यांच्या मार्गदर्शना खाली नळदुर्ग एसटी बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रण अनिल हांडे, गुंडू डुकरे, मुकुंद वैद्य व महेश डुकरे यांनी हुतात्मा बाबूराव बोरगावकर माध्यमिक शाळा साखर कारखाना नळदुर्ग येथे येऊन विद्यार्थ्यांना मोफत व रोखीचे एसटी पास दिले शाळेत जाऊन विद्यार्थीनीचा शोध घेऊन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शंभर टक्के सवलतीचे पासचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेची संचालक मोहन भोसले , शाळेचे मुख्याध्यापक नरवडे आर पी विभाग प्रमुख मोरे यूवी सहशिक्षक सुभेदार एस एस सहशिक्षक नरे व्ही सी सहशिक्षिका कामशेट्टी सी पी निवृत्ती कोकरे एस पी भोसले व डी डी उपस्थित होते.

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आवाहन

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब पाजावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी रविवार, २८ जून २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी राज्यभरात ८९,४८९ लसीकरण बुथ, २६,५३० ट्रान्झिट पथके, १३,५१८ मोबाईल पथके आणि ५८६ रात्रपाळी पथके कार्यरत राहणार आहेत.

देशाला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात पोलिओचा शेवटचा रुग्ण सप्टेंबर २०१० मध्ये बीड जिल्ह्यात आढळला होता, तर देशातील शेवटचा रुग्ण जानेवारी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये नोंदविण्यात आला होता. त्यानंतर २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले. मात्र, शेजारील काही देशांमध्ये अद्यापही पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने देशात या आजाराचा प्रसार होण्याचा धोका कायम असून सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात रविवार, २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ कोटी ३ लाख बालकांना सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत पोलिओ प्रतिबंधक बायव्हॅलेंट ओरल पोलिओ व्हॅक्सीन (लजझत) चे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत.

बुथवर येऊ न शकलेल्या बालकांचे शहरी भागात पुढील पाच दिवस आणि ग्रामीण भागात पुढील तीन दिवस आरोग्य कर्मचाऱ्यांकडून गृहभेटीद्वारे लसीकरण करण्यात येईल. तसेच प्रवासात असलेल्या बालकांसाठी ट्रान्झिट, मोबाईल आणि रात्रपाळीच्या विशेष पथकांमार्फतही मोहिमेच्या कालावधीत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य लसीकरण कृती दलाची बैठक घेण्यात आली असून सर्व संबंधित शासकीय विभाग आणि विविध यंत्रणांना सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. मोहिमेच्या समन्वयासाठी प्रत्येक जिल्हा आणि महानगरपालिकेसाठी राज्यस्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा, तालुका आणि वॉर्ड स्तरावरही नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर वैद्यकीय अधिकारी तसेच लसीकरण कर्मचाऱ्यांचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व शहर लसीकरण कृती दलाच्या बैठका घेण्यात आल्या असून मोहिमेसाठी आवश्यक निधी, वित्तीय मार्गदर्शक सूचना आणि पोलिओ लसीचा पुरेसा साठाही सर्व जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.,

# फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचवा; खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन संवाद सभेत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले या मालिकेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करत फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचविण्यासाठी समाजाने एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन केले. गुगल मिटच्या माध्यमातून आयोजित या सभेला राज्यभरातील संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक बांधव तसेच ओबीसी बहुजन समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचवा; खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे आवाहन

सभेच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संघटनेचे सरचिटणीस संतोष भोजने यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा क्षीरसागर-कदम यांनी तर आभार प्रदर्शन लहू राक्षे यांनी केले.

_मार्गदर्शन करताना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले या मालिकेची निर्मिती, तिचा उद्देश, समाजप्रबोधनातील भूमिका तसेच मालिका बंद होण्यामागील विविध घडामोडी यांचा सखोल उहापोह केला. स्टार प्रवाह वाहिनीवरून ही मालिका बंद करण्यात आली असली तरी ती सध्या मराठी वारसा या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रश्नोत्तराच्या सत्रात उपस्थित पदाधिकारी व शिक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. कोल्हे यांनी मालिकेचा सर्व अंगांनी परामर्श घेतला. मालिकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक परिणाम, प्रबोधनात्मक भूमिका, प्रसारणाशी संबंधित अडचणी आणि पुढील वाटचाल याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. समाजाच्या इतिहासाशी आणि महापुरुषांच्या कार्याशी संबंधित विषय अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी ओबीसी बहुजन समाजातील सर्व नागरिकांना मराठी वारसा यूट्यूब चॅनल मोठ्या प्रमाणावर सबस्क्राईब करण्याचे आवाहन केले. फुले दांपत्यांचे विचार, त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी ही मालिका अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

सभेच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. अमोल कोल्हे यांच्या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रसारासाठी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ अधिक जोमाने कार्य करेल, असा निर्धार प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांच्यासह सर्व पदाधिकारी यांनी व्यक्त केला.